# जाहीर सिलबंद दरपत्रके

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे घटकाचे शासकीय वाहनांसाठी १) टायर पंक्चर, ओपनिंग फिटींग, व्हील अलायमेंट व बॅलेन्सींग कामे , २) सीट कुशनींग कामे / ॲक्सेसरिज, ३) मशनिंगची कामे ( इंजीन,हेड, इंजीन, ब्लॉक, ड्रम कटिंग), ४) रेडीयमची कामे ,५) वाहनाचे डेंटिंग पेंटिंग व कलरींग कामे ,६) रेडिएटरची कामे ( दुरुस्ती, शोल्डींग, वेल्डींग) ,७) पाटयांची कामे , ८) वाहनाची पी.यु.सी., ९) ऑईल / कॉटनवेस्ट / डिस्ट्रील वॉटर ,१०) ए.सी.दुरुस्तीची कामे ,११) शासकिय वाहनांना लोखंडी जाळया बसविणे,१२) शासकिय फ्लॅग / मोनोग्राम /मोनोग्राम बॉक्स, १३) शासकिय वाहनांना लाईट, सायरन व पीए सिस्टीम, १४) शासकीय वाहनांना बॅटरी खरेदी इ. पुरवठा करणेबाबत इच्छुक व अधिकृत मान्यताप्राप्त पुरवठा धारकांकडुन सिलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

दरपत्रकाची संपुर्ण माहिती, अटी व शर्ती www.puneruralpolice.gov.in या वेब साईटवर फक्त पाहण्यास उपलब्ध आहेत.

पुणे
दिनांक ०३ /०६/२०२४

( पंकज देशमुख ) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण

**पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण, यांचे कार्यालय,**
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे - 411 008
दुरध्वनी क्रमांक 020-25657878 फॅक्स क्र. 020-25674641
ई मेल - sp.pune.r @mahapolice.gov.in

जावक क्र.पशा-११/शा.वाहनासाठी दरपत्रके /२०२४-२५/६ पुणे, दिनांक /०५/२०२४ 03/06/2024

## सिलबंद दरपत्रक सुचना

**विषय:** सिलबंद दरपत्रक मागविणेबाबत..

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे घटकाचे शासकीय वाहनांसाठी खालील नमूद वस्तु खरेदी / दुरुस्ती करणेसाठी खालील विहित केलेल्या अटी व शर्तीना अधीन राहून नोंदणीकृत व्यावसायिक पुरवठादार / इच्छुक व कंपनीचे अधिकृत मान्यता प्राप्त पुरवठा धारकांकडुन सिलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

**अ) साहित्य / वस्तुचे वर्णन :**

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| 1 | टायर पंक्चर, ओपनिंग फिटींग, व्हील अलायमेंट व बॅलेन्सींग कामे |
| 2 | सीट कुशनींग कामे / ॲक्सेसरिज |
| 3 | मशनिंगची कामे ( इंजीन,हेड, इंजीन, ब्लॉक, ड्रम कटिंग) |
| 4 | रेडीयमची कामे |
| 5 | वाहनाचे डेंटिंग पेंटिंग व कलरींग कामे |
| 6 | रेडिएटरची कामे ( दुरुस्ती, शोल्डींग, वेल्डींग) |
| 7 | पाटयांची कामे |
| 8 | वाहनाची पी.यु.सी. |
| 9 | ऑईल / कॉटनवेस्ट / डिस्ट्रील वॉटर |
| 10 | ए.सी.दुरुस्तीची कामे |
| 11 | शासकिय वाहनांना लोखंडी जाळया बसविणे |
| 12 | शासकिय फ्लॅग / मोनोग्राम /मोनोग्राम बॉक्स |
| 13 | शासकिय वाहनांना लाईट, सायरन व पीए सिस्टीम |
| 14 | शासकीय वाहनांना बॅटरी खरेदी |

**ब) अटी व शर्ती :-**

1. वर नमूद तपशीलातील साहित्य /वस्तुंचे /दुरुस्तीचे दरपत्रक सादर करणाऱ्या पुरवठादार /कंपनीने नोंदणी प्रमाणपत्र,पॅन नंबर,सेवाकर/ आयकरसंबंधीची सांक्षांकित केलेली कागदपत्रे दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक राहील.
2. प्रस्तुतचा करारनामा हा 2024-25 या आर्थिक वर्ष कालावधीकरिता राहील,सदर कराराचा कालावधी वाढविणेचा / कमी करणेचा हक्क कार्यालय राखून ठेवीत आहे.
3. सिलबंध दरपत्रक वर नमूद कोणत्या कामाकरिता सादर केले ते ठळक अक्षरात पाकिटावर नमूद करावे. तसेच दरपत्रक मा.पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, चव्हाणनगर, पाषाणरोड,पुणे यांचे नावे मोटार परिवहन विभाग, पुणे ग्रामीण, चव्हाणनगर, पाषाणरोड,पुणे येथे सादर करावे.
4. कार्यालयास व मंजूर दरपत्रक धारकास मान्य होतील अशा अटी व शर्ती करारनामा करावा लागेल.

CS CamScanner

5. सेवा कालावधीमध्ये सेवा समाधानकारक न दिल्यास केलेला करारनामा रद्द केला जाईल याची नोंद घ्यावी.
6. सदर दरपत्रकातील अटी व शर्ती यामध्ये बदल करण्याचे अधीकार तसेच दरपत्रक प्रक्रियेतील काही भाग अथवा पूर्ण दरपत्रक प्रक्रिया कोणतेही कारण नमुद न करता अगर पुर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण हे राखून ठेवत आहेत.
7. दरपत्रकधारकाने दिलेले दरामध्ये नमूद साहित्य / वस्तु पुरविणे बंधनकारक राहील.
8. दरपत्रकामधील सर्व दर हे सर्व करांसह असावेत.
9. दरपत्रकधारकाला देय रक्कमेमधुन शासनाच्या नियमाने 2%(किंवा लागु असेल त्याप्रमाणे) आयकर(TDS) व 2% अतिरिक्त GSTकपात करण्यात येईल.
10. दरपत्रकातील प्रत्येक पान हे दरपत्रककार पुरवठादार / कंपनीने अधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांने स्वयंसांक्षाकिंत करणे आवश्यक राहील.
11. वर नमूद तपशिलातील साहित्य / वस्तुंचा /दुरुस्ती पुरवठा किमान 45 दिवस उधारीतत्वावर करणे बंधनकारक राहील.
12. दरपत्रकसंदर्भातील सर्व निर्णय पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण हे घेतील व ते सर्व दरपत्रककार यांचेवर बंधनकारक असतील.
13. कोणतेही दरपत्रक मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क तसेच कोणतेही कारण न देता सदर दरपत्रक सुचना पुढे ढकलणे किंवा रद्द करणे यांचे अधीकार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखून ठेवले आहेत. तसेच अशा मंजूर किंवा नामंजूर दरपत्रकाबाबत कोणतेही स्पष्टीकरण पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण हे इतर दरपत्रककारांना देणार नाहीत.
14. दरपत्रकेमधील सर्व दर हे संपुर्ण करार कालावधीसाठी बंधनकारक असतील.
15. कोणत्याही दरपत्रकातील कोणतेही दर बाजारभावापेक्षा जास्त असतील तर अशा दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.
16. दरपत्रकामधील सर्व दर हे सर्व करांसहीत असावेत. कर रचना बदलल्यास त्यासाठी वेगळी रक्कम देण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

**क) दरपत्रक दाखल करण्याची पध्दती :-**

1) दरपत्रकाची संपुर्ण माहिती, अटी व शर्ती www.puneruralpolice.gov.in या वेब साईटवर फक्त पाहण्यास उपलब्ध आहेत.
2) पुरवठादार / दरपत्रककारांनी सोबत जोडावयाची कागदपत्रे.
   अ) दरपत्रककार कंपनीचे पुर्ण नाव व पत्ता दुरध्वनी व ई मेलसह (कंपनीचे लेटरहेडवर )
   आ)दरपत्रककार कंपनीचे मालकाचे /भागीदारांचे/ संचालकांचे पुर्ण नाव व पत्ते दुरध्वनीसह (कंपनीचे लेटरहेडवर)
   इ) दरपत्रककार कंपनीचे व्यवसाय नोंदणीप्रमाणपत्र (Company in corporation/ shop Act).
   ई) दरपत्रककार कंपनीचे /मालकाचे PAN Card/ Tan Card
   उ) दरपत्रककार कंपनीचे मागील तीन वर्षाचे Income Tax Return
   ऊ)दरपत्रककार कंपनीचे GST Registration Certificate.
   ए) दरपत्रककार कंपनी किंवा त्यांचे मालक यांच्यावर कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयामध्ये फसवणूकीची /गैरप्रकाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही चौकशी चालु/प्रलंबित नसली पाहीजे. तसेच पुरवठादार / दरपत्रककार कंपनीचा समावेश सरकारी काळया यादीत नसला पाहीजे.
3) साहित्य / वस्तुंचा /दुरुस्ती पुरवठयासाठी कार्यालयाचा पत्ता - मोटार परिवहन विभाग, पुणे ग्रामीण, चव्हाणनगर, पाषाणरोड, पुणे

कृपया पुढील पानावर पहावे.

CamScanner

4) साहित्य /वस्तु /दुरुस्ती चे दर कंपनीच्या लेटरहेडवर छापील स्वरुपात सही व शिक्क्यानिशी देण्यात यावेत.

5) उपरोक्त नमुद केलेल्या पध्दतीने सादर न झालेले दरपत्रक नाकारण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

**ड) दरपत्रक दाखल करणे/निवीदा उघडणे याबाबतचा तपशील :-**

| | | |
|---|---|---|
| 1 | दरपत्रक मागविण्याचा दिनांक | दिनांक **10/ 06/2024** ते दिनांक **14/06/2024 कार्यालयीन वेळेत (शासकिय सुटटीचे दिवस वगळून )** |
| 2 | दरपत्रक दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक **14.06/2024 दुपारी 15.00** वाजेपर्यंत |
| 3 | दरपत्रक पुर्व बैठक (Pre Bid Meeting) | दिनांक **11/06/2024 दुपारी 13.00** वाजता पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयात होईल. |
| 4 | दरपत्रकउघडण्याचा दिनांक व वेळ | दरपत्रक दिनांक **18/6/2024 रोजी 16.00 वा.**उघडण्यात येतील. |
| 5 | संपर्क अधिकारी | 1. श्री. पी.आर.माने, पोलीस निरीक्षक,मोटार परिवहन विभाग, पुणे ग्रामीण, चव्हाणनगर, पाषाणरोड, पुणे भ्रमणध्वनी क्रमांक 9960832345<br>2.श्री. व्ही.पी. चव्हाण,व.श्रे.लिपीक, पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालय, चव्हाणनगर, पाषाणरोड, पुणे भ्रमणध्वनी क्रमांक 9021749269<br>3.श्री. व्ही.यु.मरगजे, क.श्रे.लिपीक, पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालय, चव्हाणनगर, पाषाणरोड, पुणे भ्रमणध्वनी क्रमांक 9561344809 |

प्रस्तावीत करारासंबधी काही शंका असल्यास त्याच्या निराकरणासाठी पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयात उपरोक्त नमुद केलेल्या संपर्क अधिकारी यांचेशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा .

**नोट:-** पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालय हे कायदा व सुव्यवस्थेचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे काम करित असल्यामुळे दरपत्रक उघडण्याची दिलेली तारिख व वेळ कधीही बदलु शकते याची नोंद घ्यावी.

**( पंकज देशमुख )भा.पो.से.**
**पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण**

CS CamScanner